दिनांक : १७/१०/२०१७.

# निवेदन

## महानिर्मितीच्या कोळसा साठ्याच्या स्थितीत सुधारणा

महानिर्मितीच्या औष्णिक वीजकेंद्रांतील कोळसा पुरवठा व साठा याबाबतच्या स्थितीत गेल्या सुमारे १० दिवसांपासून सातत्याने सुधारणा होत असून गेल्या महिन्याच्या तुलनेत कोळसा पुरवठ्याच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होताना दिसत आहे. मागील महिन्यांत महानिर्मितीला प्रतिदिन सरासरी १८ ते २० रेक्स इतका कोळसा पुरवठा होत होता. तथापि, कोळसा खाणींमधील पावसाळ्यातील परिस्थितीत दिवसेंदिवस सुधारणा झाल्यामुळे तसेच मा. मुख्यमंत्री यांनी महानिर्मिती व कोळसा कंपनी व रेल्वे यांची उच्चस्तरीय बैठक घेतल्यानंतर कोळसा कंपन्यांकडून होत असलेल्या कोळसा पुरवठ्यात चांगल्या प्रमाणात वाढ झाली आहे. विशेषत: गेल्या १० दिवसांत तर सरासरी २५ कोळसा रेक्स महानिर्मितीला प्राप्त होत आहेत. याशिवाय रस्ते वाहतुकीच्या माध्यमातून प्रतिदिन सरासरी सुमारे १०००० ते १२००० टन कोळसा महानिर्मितीला प्राप्त होत आहे. त्यायोगे महानिर्मितीच्या वीजनिर्मितीत तरी मागील महिन्याच्या तुलनेत सध्या ८०० ते १००० मेगावॅट इतकी वाढ झालेली आहे. नजीकच्या काही दिवसांत यात आणखी सुधारणा होऊन केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सी.ई.ए.) च्या मागदर्शक तत्वांनुसार वीजकेंद्रात अपेक्षित कोळसा साठा राखणे शक्य होईल असा विश्वास आहे. सद्यस्थितीत कोळशाच्या उपलब्धतेनुसार जास्तीत जास्त वीजनिर्मिती करण्यास महानिर्मितीचे सर्वोच्च प्राधान्य आहे.

******

Date : 17/10/2017

# MAHAGENCO's Statement about Improved Coal Stock Situation

Since last 10 days, the coal supply & thereby coal stock situation at MAHAGENCO's Thermal Plants is improving day-by-day. In comparison with first 7 days of October month, average supply of 18 to 20 coal rakes, which has improved to 22 to 25 rakes per day between 7/10/2017 to 17/10/2017, as the coal companies have nearly overcome the monsoon calamities. Especially, as an end result of recently held high level joint meeting chaired by Hon'ble Chief Minister, GoM in between MAHAGENCO, Coal India Ltd., & Railway, since last 10 days, the average coal rakes receipt to MAHAGENCO is approx. 25 rakes. In addition to this MAHAGENCO is obtaining daily about average 10000-12000 tonnes coal by road transport to cope up with increasing demand of coal. By this measures, MAHAGENCO is in a position to increase its power generation by 800-1000 MW per day in comparison with that in previous month. Further, MAHAGENCO believes that there will be continual trend of such improvement in coal supply, so as to maintain adequate coal stock at its thermal plants as per guidelines of CEA.

******